Adda247

I18

2023

प्रश्नपुस्तिका क्रमांक
BOOKLET NO.
102435

# भाषा पेपर क्र. – 1/Language Paper – 1

दर्जा : उच्च माध्यमिक शालांत परीक्षा
Standard : H.S.C.

एकूण गुण : 100
Maximum Marks : 100

प्रश्नपत्रिकेचे स्वरूप : पारंपरिक
Nature of Paper : Conventional type

कालावधी : 3 तास
Time allowed : 3 Hours

सूचना / Note :

(i) उमेदवाराने भाग – 1 मराठी व भाग – 2 इंग्रजीकरिता दोन स्वतंत्र उत्तर–पुस्तिका वापरावी.
Candidates should use two separate answer-books for Part – 1 Marathi and Part – 2 English.

(ii) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.
All questions are compulsory.

(iii) प्रश्नासमोरील अंक गुण दर्शवितात.
Figure to the RIGHT indicates marks of the respective question.

(iv) तर्कसंगत, नेमक्या आणि परिणामकारक लिखाणास यथोचित गुण देण्यात येतील.
Credit will be given to correct spelling, punctuation, good handwriting and neatness.

(v) उत्तर–पुस्तिकेच्या आतील भागात कोठेही उमेदवाराने बैठक क्रमांक, स्वत:चे किंवा इतरांचे नाव, सही, पत्ता किंवा आपली ओळख देणारे चिन्ह नमूद करू नये, अन्यथा तो शिक्षेस पात्र ठरेल.
Candidates should not write roll number, any name (including his/her own), signature, address or any indication of his/her identity anywhere inside the answer-book otherwise he/she will be penalised.

(vi) उमेदवाराने प्रत्येक प्रश्नातील उपप्रश्न यांची उत्तरे एकत्र सोडवावयाची आहेत. उत्तराचा काही भाग किंवा एक उपप्रश्न एकीकडे व दुसरा दुसरीकडे (काही पृष्ठे सोडून वा अन्य प्रश्न सोडवून तद्नंतर) सोडवल्यास दुसरा भाग/उपप्रश्न दुर्लक्षित केला जाईल.
Candidates are expected to answer all the sub-questions of a question together. If part of answer or sub-question of a question is attempted elsewhere (after leaving a few pages or after attempting another question) the later shall be overlooked.

(vii) उमेदवाराने भाग – 1 मराठी या उत्तर–पुस्तिकेत भाग – 2 इंग्रजीचा प्रश्न सोडवू नये, तसेच भाग – 2 चे उत्तर–पुस्तिकेत भाग – 1 (मराठी) चे प्रश्न सोडवू नयेत. सोडविल्यास तो दुर्लक्षित केला जाईल.
Candidates should not answer Part – 1 Marathi Question in Part – 2 English answer-book and vice-versa, otherwise it will be overlooked.

SEAL

P.T.O.

भाग – 1 मराठी (अनिवार्य) 50

**Q1.** खालीलपैकी एका विषयावर 400 शब्दांत निबंध लिहा. 25

(अ) जी २० परिषदेचे यशापयश

(ब) चांद्रायान ३ मोहीम

**Q2.** इंग्रजी उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा. 15

For one can hardly assert that the moral aspect of human life in general is today more satisfactory than it was in 1876.

At that time the view obtained that everything was to be hoped for from enlightenment in the field of ascertainable scientific fact and from that conquest of prejudice and superstition. But the clearing away of obstacles does not by itself lead to an ennoblement of social and individual life. For along with this negative result, a positive aspiration and effort for an ethical moral configuration of our common life is of overriding importance. Here no science can save us. I believe, indeed, that overemphasis on the purely, intellectual attitude, often directed solely to the practical and factual, in our education, has led directly to the impairment of ethical values. I am not thinking so much of the dangers with which technical progress has directly confronted mankind, as of the stifling of mutual human considerations by a "matter-of-fact" habit of thought which has come to like a killing frost upon human relations.

Fulfillment one the moral and esthetic side is a goal which lies closer to the preoccupations of art than it does to those of science. Of course, understanding becomes fruitful only when it is sustained by sympathetic feeling in joy and in sorrow. The cultivation of this most important spring of moral action is that which is left of religion when it has been purified of the elements of superstition.

The frightful dilemma of the political world situation has much to do with this sin of omission on the part of our civilization. Without "ethical culture" there is no salvation for humanity.

(Words : 278)

**Q3.** पुढील उताऱ्याचे 1/3 शब्दांत सारांश–लेखन करा आणि त्याला योग्य असे शीर्षक द्या. **10**

अखेर विज्ञानातून हाती लागणारे सिद्धांत हा केवळ समजून घेण्याचा विषय आहे. तंत्रविद्येच्या साह्याने मानवी जीवन सुखपूर्ण करण्यासाठी त्याचा उपयोग करून घेतला की तेथे विज्ञानाची सीमा येते. नीतिशास्त्रातील तत्त्वे हा केवळ जाणण्याचा विषय नाही, तर ती आचरणात उतरावयाची असतात. उन्नत पातळीवर पोचलेल्या धर्मातील आणि अध्यात्मातील गहन सत्ये अनुभवावयाची असतात. हळूहळू साधना करीत ती आपलेपणाचाच भाग बनवावयाची असतात ...... आर्यसमाजाचे संस्थापक स्वामी दयानंद गाढे विद्वान, वेदांचे पक्के अभिमानी आणि मूर्तिपूजा न मानणारे होते. पण घटकोघटकी जगन्मातेचे नाव घेणाऱ्या रामकृष्णांची भावावेशातील तन्मयावस्था डोळ्यांनी पाहिल्यावर ते उद्गारले, ''वेदांताची शुष्क चर्चा करणारे आमच्यासारखे पंडित केवळ ताक घुसळत बसतात, तर यांच्यासारखे पुरुष मात्र सारे लोणी फस्त करून जातात''. अध्यात्माच्या क्षेत्रात अखेर अनुभूतीचा महिमा आहे तो असा.

भविष्यकाळांतील अधिक प्रगत अशा मानवीसंस्कृतीचे रूप कसे असेल ? अध्यात्म आणि विज्ञान या दोहोंचे सापेक्ष स्थान ध्यानात घेतले, तर ते चित्र डोळ्यांपुढे उभे करणे अवघड जाऊ नये. अध्यात्माचा विज्ञानाशी किंवा विज्ञानाचा अध्यात्माशी विरोध असण्याचे कारण नाही. या दोहोंनी आपापली क्षेत्रे जाणून असावे आणि परस्परांना पूरक व्हावे. विज्ञान आणि अध्यात्म या दोहोंचा मेळ घालणे ही संस्कृतीच्या सर्वांगीण प्रगतीची ग्वाही ठरेल. विज्ञानाच्या बरोबरीने अध्यात्माचा स्वीकार केला जाईल तेव्हा न्याय, बंधुता, समता आदी तत्त्वांचा आचार केवळ स्वाभाविकपणे होत राहील, माणसामाणसांतील भांडणे आणि राष्ट्राराष्ट्रांतील कलह यांना आपोआप पूर्णविराम मिळेल, मानवाचे जीवन अधिकाधिक अर्थपूर्ण होत जाईल, जीवनातील साफल्याचा रस्ता अधिक सुस्पष्ट आणि मोकळा होईल. भविष्यकाळात जेव्हा केव्हा हे घडून येईल, तेव्हा रसेलसारखे तत्त्वज्ञ आणि रवींद्रनाथांसारखे कवी यांनी रंगविलेली स्वप्ने साकार होतील, महात्मे आणि संतपुरुष यांची उपदेशवाणी सार्थकी लागेल आणि कृष्ण, बुद्ध किंवा ख्रिस्त अशा ईश्वरी पुरुषांची स्वर्गाचे राज्य भूतलावर अवतरण्याची आशीर्वचने प्रत्यक्षात उतरतील. (शब्दसंख्या : २४६)

246×1/3

82

## PART – 2 ENGLISH (COMPULSORY) 50

**Q1.** Write an essay on **any one** of the following topics in about **400** words. 25

(a) Plastic : Boon or Curse.

(b) Digitization and Human Life.

---

**Q2.** Translate the following passage into English. 15

आज जीवनाच्या सर्वत्र क्षेत्रात व्यवस्थापन हा शब्द परवलीचा झाला आहे. कौटुंबिक व्यवस्थापन, आर्थिक व्यवस्थापन, वेळेचे व्यवस्थापन, कार्यालयीन व्यवस्थापन, भावनिक व्यवस्थापन या गोष्टी मानवी जीवनाचा अविभाज्य घटक बनल्या आहेत. माणसाचे जीवन सुखी आणि उत्साही राहायचे असेल तर मनाच्या व्यवस्थापनाकडेही लक्ष दिले पाहिजे.

आज आपण एक अत्यंत गतिमान युगात राहात आहोत. अस्तित्वासाठीचा संघर्ष तीव्र झालेला आहे. अगदी शालेय विद्यार्थ्यांचीही या स्पर्धेतून सुटका नाही. माणसाने आकाशात जाण्याचे स्वप्न जरूर पाहायला हवे पण ते पहात असताना स्वत:च्या मर्यादांची जाणीव ठेवली पाहिजे. कशासाठी संघर्ष करायचा व किती करायचा या गोष्टी समजल्या पाहिजेत. सुखी जीवनासाठी करावी लागणारी धडपड महत्वाची आहे ; पण त्याच बरोबर जीवन जगणेही समजले पाहिजे. आपल्या जगण्याची व्याख्या प्रत्येकाला स्पष्ट करता आली तर मनाच्या योग्य व्यवस्थापनाच्या दिशेने उचललेले ते पहिले महत्वाचे पाऊल असेल. दुसऱ्याची तुलना न करता मी जगणार हे एकदा स्पष्ट झाले की, माणसाच्या मनावरचे ताण खूप कमी होतात. तो अगदी मोकळा होतो. अशी माणसे आवडीची कामे खूप उत्साहाने करतात. आयुष्याचा प्याला भरलेला आहे की रिकामा आहे याचा विचार करण्यापेक्षा जीवनाच्या प्याल्यातील असणाऱ्या प्रत्येक थेंबाचा आनंद घेण्याची इच्छा असणारे निरोगी मन आपण तयार करायला हवे.

मनाच्या व्यवस्थापनातली दुसरी पायरी म्हणजे आपल्या कामाचा प्राधान्यक्रम ठरवणे. हे अत्यंत तातडीचे; हे नंतर करता येण्यासारखे ; हे काही कालावधीनंतर केले तरी चालण्यासारखे व हे करण्याची आवश्यकताच नाही अशा चार प्रकारात कामांची विभागणी केली की कामाची दिशा स्पष्ट होते. आयुष्यात आपल्या वाट्याला येणारी प्रत्येक गोष्ट एक अनुभव म्हणून स्वीकारण्याची मानसिकता तयार केली की संकटात आणि कठीण प्रसंगातही माणसाचे मनोधैर्य कमी होत नाही.

आपल्या मनामध्ये अनेक भावना व विचार असतात. हे विचार चांगले असतील तर व्यक्ती चांगले कार्य करण्यासाठी प्रवृत्त होत असते. आपण ज्या पद्धतीने विचार करतो त्यानुसार आपली बुद्धी आणि इंद्रिये कार्य करीत असतात म्हणून मनात नेहमी सकारात्मक विचार असले पाहिजेत.

(एकूण शब्दसंख्या : २७१)

Adda247

**Q3.** Write a precis of the following passage in about **1/3** of its original length, with suitable title : **10**

Another promising new technology is IoT. Many "things" are now being built with Wi-Fi connectivity, meaning they can be connected to the Internet and to each other. Hence, the Internet of Things, or IoT. The Internet of Things is the future, and has already enabled devices, home appliances, cars and much more to be connected to and exchange data over the Internet.

As consumers, we are already using and benefiting from IoT. We can lock our doors remotely if we forget to when we leave for work and preheat our ovens on our way home from work, all while tracking our fitness on our Fitbits. However, businesses also have much to gain now and in the near future. The IoT can enable better safety, efficiency and decision making for businesses as data is collected and analysed. It can enable predictive maintenance, speed up medical care, improve customer service, and offer benefits we haven't even imagined yet.

And we are only in the beginning stages of this new technology trend. Forecasts suggest that by 2030 around 50 billion of these IoT devices will be in use around the world, creating a massive web of interconnected devices spanning everything from smart phones to kitchen appliances. The global spending on the Internet of Things (IoT) is forecast to reach 1.1 trillion U.S. dollars in 2023.

And if you wish to step foot in this technology, you will have to learn about information security, Artificial Intelligent and machine learning fundamentals, networking, hardware interfacing, data analytics, automation, understanding of embedded systems, and must have device and design knowledge.

(Total words : 261) x 1/3

87

Adda247